# 1991 नंतर भारत सरकारचे सार्वजनिक उपक्रमाबाबतचे बदलते धोरण

डॉ. बाळासाहेब निर्मळ

स्वतंत्र भारताने देशाच्या आर्थिक विकासासाठी मिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. त्याला नियोजनाची जोड देवून सामाजिक न्यायासह समतोल आर्थिक विकास साधण्यांसाठी विविध पंचवार्षिक योजना आणि औदयोगिक धोरणांची निर्मिती करण्यात आली. पहिल्या औद्योगिक धोरणापासुन 1991 पर्यंतच्या सर्व औद्योगिक धोरणावर पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या विचारसरणीचा प्रभाव असल्याचे प्रखरतेने दिसुन येते. नेहरुंनी देशाच्या औद्योगिक विकासासाठी सार्वजनिक उपक्रमांना अधिक प्राधान्य दिले. कारण देशामधील तत्कालीन औद्योगिक आणि आर्थिक स्थिती कारणीभूत होती.1951 मध्ये देशात बचतीचा आणि गुंतवणुकीचा दर 10% ते 12% होता. देशी उद्योजकांची संख्या आगदी नगण्य होती. तंत्रज्ञान सुमार दर्जाचे होते. आवश्यक उद्योगांच्या उभारणी मध्ये तत्काळ नफ्यांची खात्री नसताना मोठ्या प्रमाणात भांडवल उभारण्यांची गरज होती. परकीय मदतीचा ओघ अत्यंत कमी होता. खाजगी उद्योगांना कमी दराने आवश्यक वस्तुंचा पुरवठा करणे आवश्यक होते. अशा परिस्थितीचा मुकाबला करण्यासाठी नेहरुंनी सार्वजनिक उपक्रमांना अधिक महत्व दिले. *पंडित जवाहरलाल नेहरु च्या मते 'सार्वजनिक उपक्रम ही काही समाजवादी समाजरचनेची नांदी नाही तर वसाहतवादानंतर सर्वच विकसनशिल देशाची गरज आणि आवश्यकता आहे'*.

1948 ते 1991 पर्यंतच्या सर्वच औद्योगिक धोरणांच्या माध्यमातून विविध सार्वजनिक उपक्रमांच्या निर्मितीवर अधिक भर देण्यात आला. परंतु याच सार्वजनिक उपक्रमांची कार्यक्षमता आणि चुकीच्या पध्दतीचे व्यवस्थापन यामुळे 1980 च्या दशकात या उपक्रमाबाबत नकारात्मक चर्चा सुरु झाली. याच बरोबर वाढती लोकसंख्या, बेरोजगारी, दारिद्र्य, प्रादेशिक असमतोल, अकारण सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या दैनंदिन व्यवहारात तसेच व्यवस्थापन मंडळांच्या सदस्य - अध्यक्ष आणि संचालकाच्या नेमणूकीत सरकारची सतत ढवळाढवळ, लालफितशाही, अधिकाऱ्यांची बेजबादारी, उत्पादन आणि सेवांची बाजार भावाने किंमत न ठरविण्यांचे अव्यवहारी धोरण इत्यादी बाबी सार्वजनिक उपक्रम आणि त्यांच्या व्यवस्थापनातील दुर करण्यात सरकारला अपयश आले. त्यामूळे सार्वजनिक क्षेत्रावरील सर्वसामान्य माणसाची विश्वासर्हायता डळमळीत होवुन हे सार्वजनिक उपक्रम सफेद हात्ती सिध्द झाले होते.

1991 च्या औद्योगिक धोरणामध्ये सार्वजनिक उपक्रमांबाबतच्या पुर्वीच्या धोरणात व्यापक बदल करण्यात आले. हे बदल करण्यासाठी तत्कालीन परस्थितीमध्ये देशासमोरील आर्थिक अरिष्ट आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांचा दबाव व सार्वजनिक उपक्रमांचे देशाच्या अर्थव्यवस्थेतील स्थान गृहीत धरुण कार्यात्मक आणि रचनात्मक सुधारणा राबविण्यास 1991 नंतर सुरुवात झाली. सरकारने सार्वजनिक उपक्रमाबाबत भूमिका अधिक स्पष्ट करताना भारतीय सार्वजनिक उपक्रमांना अधिक प्रतिस्पर्धात्मक वातावरण निर्माण करणे, तोट्यात चालणारे उपक्रम बंद करणे, खाजगीकरणाच्या तत्वाचा स्वीकार करणे. एकाधिकारशाही कमी करुन खाजगी क्षेत्रासाठी गुंतवणुकीस प्राधान्य देणे यामूळे भारतीय अर्थव्यवस्थेला अधिक गती प्राप्त होवून देशात उत्पादकता आणि कुशलता यामध्ये वाढ होईल. यासाठी सरकार व्दारा विविध धोरणात्मक निर्णय आणि प्रक्रियात्मक सुधारणा करण्यात आल्या आहेत. याची चर्चा या संशोधन पेपर मध्ये करण्यात आली आहे.

**सार्वजनिक उपक्रम विभागाचे पुनर्गठनः**

तिसऱ्या लोकसभेच्या प्राक्कलन समितीने आपल्या 52 व्या अहवालामध्ये केंद्रीय समन्वयकारी विभागाची स्थापना करण्यांच्या आवश्यकतेवर भर देवून या विभागाकडे सरकारी उपक्रमांच्या कार्यनिष्पादनाचे निरंतर मुल्यंमापन करण्याची जबाबदारी सोपविण्याची महत्वपूर्ण शिफारस भारत सरकारला करण्यात आली. या आधारे भारत सरकारने सप्टेंबर 1965 मध्ये लोक उद्यम ब्युरो ची स्थापना केली.1985 मध्ये विविध विभाग आणि मंत्रालयाची पुनर्बांधनी करताना लोक उद्यम ब्युरोला

उद्योग मंत्रालयाचा हिस्सा बनविण्यात आले.1990 मध्ये या विभागाला स्वतंत्र विभागाचा दर्जा देण्यात आला. सध्या हा विभाग अवजड उद्योग आणि सार्वजनिक उपक्रम मंत्रालयाचा रुपात कार्यरत आहे. हा विभाग आज केंद्र सरकारच्या सर्व विभागांर्तगत कार्यरत असलेल्या सार्वजनिक उपक्रमांची नोडल एजन्सीच्या रुपात कार्यरत आहे. या विभागासाठी स्वतंत्र कॅबिनेट मंत्री असून सर्व प्रशासकीय कामकाज सचिवांच्या नेतृत्वाखाली चालते. या मंत्रालयात आज जवळपास 126 साहाय्यक कर्मचारी कार्य करत आहेत.

**केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांच्या संचालक बोर्डांचे व्यावसायीकरण:**

1991 च्या औद्योगिक धोरणामध्ये सार्वजनिक उपक्रमाबाबत केलेल्या सुधारणामध्ये केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांच्या संचालक मंडळाचे व्यावसायीकरण करण्यावर अधिक भर दिला आहे. साधारणतः सार्वजनिक उपक्रमांच्या संचालक मंडळाच्या नियूक्तीबाबत भारत सरकारचा सार्वजनिक उपक्रम विभाग दिशा-निर्देश देत असतो. 1992 मध्ये याबाबत दिशा-निर्देशामध्ये सार्वजनिक उपक्रमांच्या संचालक मंडळावर संचालकांची नियूक्ती करताना बाहेरील विशेषतज्ञाची नियुक्ती अंशकालीन गैर-शासकीय संचालक म्हणून करावी. अशा संचालकांची संख्या संचालक मंडळाच्या 1/3 असावी. ज्या उपक्रमामध्ये कार्यकारी अध्यक्ष हे पद आहे. अशा उपक्रमामध्ये ½ संचालक हे अंशकालीन गैर-शासकीय संचालक म्हणून नियुक्ती करावी असे दिशा-निर्देश देण्यात आले. याचबरोबर त्या संचालकाच्या नियूक्ती संबधी पात्रता आणि मानदंड निश्चित करण्यात आले आहेत.[4] 2013-14 मध्ये एकूण 115 सार्वजनिक उपक्रमामधील गैर-सरकारी संचालकांच्या 238 पदाची निवड प्रक्रीया प्रस्तवावर विचार विमर्श आणि पडताळणी करुन त्यांना नियूक्त करण्यात आली आहे. या सदस्यांना कंपनी अधिनियम 2013 च्या तरतूदीनुसार सर्व गैर सरकारी संचालकांना त्यांची कार्य आणि उत्तरदायित्वांच्या संदर्भात 2013-14 मध्ये इन्सटीट्युट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट ऑफ इंडिया च्या वतीने दिल्ली, मुंबई आणि बेंगलूरु या ठिकाणी चार कार्यशाळा घेतल्या असून यामध्ये जवळपास 80% गैर-सरकारी संचालकांनी सहभाग घेतला असून या कार्यशाळेत गैर सरकारी संचालकांना त्यांची भूमिका आणि उत्तरदायित्वाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

**सार्वजनिक उपक्रम आणि आरक्षित क्षेत्रः**

भारत सरकारने विविध औद्योगिक धोरणाच्या माध्यमातून औद्योगिक क्षेत्रातील सरकारी क्षेत्र आणि सार्वजनिक उपक्रमांसाठी राखीव ठेवून सरकारने या क्षेत्राचा विकास करण्याची जबाबदारी स्वतःवर घेतली. आणि हे क्षेत्र खाजगी उद्योगांना यामध्ये गुंतवणुक करण्यास प्रतिबंध करण्यात आले. त्यामूळे या क्षेत्रामध्ये सरकारची आणि सार्वजनिक उद्योगाची एकाधिकारशाही निर्माण झाली होती. परंतु 1991 च्या औद्योगिक धोरणामध्ये आरक्षित आणि लाईसेंस पध्दतीमध्ये बदल करुन लाईसेंस आणि परवानेची गरज फक्त 18 क्षेत्रात उद्योग उभारणीसाठी ठेवण्यात आली. यामध्ये आणखी बदल करुन 26 मार्च 1993 मध्ये 13 खनिज पदार्थ जे पुर्वी सार्वजनिक क्षेत्रासाठी राखीव ठेवण्यात आले होते. ते खाजगी क्षेत्रासाठी मुक्त करण्यात आले. आज हीच राखीव क्षेत्राची संख्या फक्त 3 इतकी कमी करण्यात आली आहे. यामध्ये परमाणु उर्जा, रेल्वे, संरक्षण साहित्य निर्मिती हेच क्षेत्र राखीव आहेत.

**नवरत्न योजनाः-**

एकूण केंद्रीय सार्वजनिक उपक्रमापैकी जे उपक्रम लाभदायक स्थितीमध्ये कार्यरत आहेत व अधिक चांगल्या पध्दतीने कार्य करण्यांची क्षमता त्यांच्याकडे आहे अशा उपक्रमांना अधिक स्वायत्तता देवून हे उपक्रम आपली ओळख आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण करतील. अशा उद्योगांना अधिक स्वायत्ततेची आवश्यकता आहे. अशा उपक्रमांसाठी भारत सरकारने जुलै,1997 मध्ये नवरत्न विषयक धोरण जाहीर करण्यात आले. नफ्यात चालणाऱ्या आणि नवरत्न दर्जाचे निकष पुर्ण करणाऱ्या उपक्रमास हा दर्जा सार्वजनिक उपक्रम विभागामार्फत दिला जातो. 2013 मध्ये नवरत्न दर्जा प्राप्त सार्वजनिक उपक्रमांची संख्या 17 आहे.

**मिनीरत्न योजना**

आक्टोबर 1997 मध्ये भारत सरकारने घोषीत करण्यात आले की, जे उपक्रम लाभ/ नफा कमविणारे आहेत पण नवरत्न दर्जा प्राप्त करु शकले नाहीत अशा उपक्रमांना देखील काही पात्रता आणि निकषाच्या आधारावर त्यांना स्वायत्तता देण्यात येईल. यामध्ये आर्थिक आणि व्यवस्थापकीय स्वायत्तेताचा समावेश असेल. त्यामूळे हे उपक्रम अधिक दक्ष होवून खाजगी क्षेत्रातील उपक्रमाशी स्पर्धा करु शकतील अशा उपक्रमांना मिनीरत्न म्हणून ओळखले जाईल. मिनीरत्न श्रेणीचे दोन वर्गीकरण करण्यात आले. श्रेणी-I , श्रेणी –II साठी निकष वेगवेगळे ठेवण्यात आले. आज एकूण सार्वजनिक उपक्रमापैकी मिनीरत्न श्रेणी I मध्ये 55 तर मिनीरत्न श्रेणी II 18 सार्वजनिक उपक्रम कार्यरत आहेत.

**महारत्न योजना :**

भारत सरकारने डिसेंबर 2010 मध्ये महारत्न धोरण घोषीत केले. या मागे सरकारची भूमिका ज्या सार्वजनिक उपक्रमांना नवरत्न दर्जा प्राप्त आहे आणि ते अत्यंत चागल्या स्थितीमध्ये कार्यरत आहेत. परंतु या उपक्रमांना अधिक स्वायत्तता दिल्यास हे उपक्रमामध्ये बहुराष्ट्रीय होण्याची क्षमता आहे. त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर ओळख प्राप्त होईल. त्यांच्या उत्पादनास मुल्य आणि ब्रॅन्ड प्राप्त होईल. यासाठी या उपक्रमांना अधिक स्वायत्तता देण्याची भूमिका सरकारने घेतली. यामध्ये व्यवस्थापकीय, भांडवल गुंतवणुक, मानवसंसाधन, उपक्रमांचा विस्तार या बाबीचा समावेश होतो. महारत्न दर्जा प्राप्त कंपन्या त्यांचा व्यवसायाचा विस्तार करुन जागतिकदृष्ट्या आंतरराष्ट्रीय कंपन्या बनु शकतात. त्यांना सरकारच्या परवानगी शिवाय एकाच प्रकल्पात 5,000 कोटी रुपयापर्यंत किंवा त्यांच्या निव्वळ मुल्याच्या 15% पर्यंत गुंतवणुक करण्याची संमती दिली जाते. तसेच निदेशक मंडळ स्तर ई-9 स्तर पर्यंत पदाची निर्मिती आणि अधिकार प्रदान करण्याची स्वायत्तता दिली जाते. सध्या एकूण केंद्रीय सार्वजनिक उपक्रमापैकी 7 उपक्रमांना महारत्न दर्जा प्राप्त झाला आहे. हे उपक्रम आज आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असून निर्यातीच्या माध्यमातून देशाला परकीय चलन मिळवून देण्यात महत्वाची भूमिका निभावत आहेत.

**सार्वजनिक उपक्रम आणि 'सामंजस्य करारनामा (MOU) :**

'सामंजस्य करारनामा' हे केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांचे व्यवस्थापन आणि भारत सरकार यांच्यामधील वार्तासम्मंत दस्तएवज असून या नूसार सरकारी उपक्रमांच्या कार्यनिष्पदनाचे वित्तीय वर्षाच्या सुरुवातीला उपक्रम आणि संबधित मंत्रालय यांच्यातील परस्पर सहमतीने निर्धारित लक्ष्य प्राप्त करण्याची हमी या करारानूसार दिली जाते. भारतामध्ये 'सामंजस्य करारनामा' प्रणालीची सुरुवात केंद्रीय सरकारी उपक्रमांच्या संबधित धोरणांची समिक्षा करण्यासाठी स्थापण करण्यात आलेल्या अर्जुन सेन गुप्ता समिती (1984) च्या शिफारशीच्या आधारावर केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत मान्यता घेवून 1987-88 मध्ये ''सामंजस्य करारनामा' पध्दती प्रायोगिक तत्वावर सुरु करण्यात आली. भारतामध्ये लागू करण्यात आलेली पध्दत फ्रान्सच्या 'सामंजस्य करारनामा' प्रणालीवर आधारित होती. 1989-90 पासुन 'सांकेतिक प्रणाली'चा स्वीकार करण्यात आला. हीच प्रणाली आजतागायत लागू आहे. फ्रान्स पध्दती आणि सांकेतिक पध्दती यामध्ये मुख्यतः फरक आहे. सांकेतिक पध्दतीमध्ये सार्वजनिक उपक्रमांच्या कार्यनिषपदनावर समग्र निर्णय करण्याच्या संबधित ही पध्दती आहे. तर फ्रान्स पध्दतीनूसार संबधीत सार्वजनिक उपक्रामांचे कार्यनिष्पादन करुन कोणत्या उद्देशाची पुर्तता झाली की नाही याची शहनिशा करता येते. परंतु कोणताही समग्र धोरणात्मक निर्णय घेण्यास या पध्दतीने अडचणी निर्माण होतात. परंतु सांकेतिक पध्दतीनूसार उपक्रमांचे मुल्यांकन निश्चित मापदंडभार यांच्या आधारावर करुन त्यानूसार त्यांचे वर्गीकरण पाच बिंदूच्या आधारावर करुन या उपक्रमांना रेंटिग प्रदान केले जाते.

**केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांचे वर्गीकरण:**

1991 नंतर सरकारने सार्वजनिक उपक्रमाबाबत महत्वाचा निर्णय घेवुन सार्वजनिक उपक्रमांना 'A', 'B', 'C', 'D', या चार क्षेणीमध्ये वर्गीकत केले आहे. साठच्या दशामध्ये देखील सार्वजनिक उपक्रमांचे वर्गीकरण करण्यात आले होते त्यांचे निकष साधारणतः उपक्रमांचे अर्थव्यवस्थेतील योगदान, उपक्रमांच्या समस्या या आधारावर या उपक्रमांचे वर्गीकरण केले जात होते. परंतु आज त्यामध्ये बदल करण्यात आले आहेत. यामध्ये या उपक्रमामधील गुंतवणुक, भांडवल, एकूण उत्पादन, विक्री, करपुर्व लाभ (नफा), कर्मचाऱ्याची एकूण संख्या, एकूण उत्पादन क्षमता, राष्ट्रीय महत्व, उपक्रमासमोरील समस्या, आधुनिक तंत्रज्ञानाचा स्विकाराचा स्तर, उपक्रमांच्या विस्ताराच्या संधी आणि बाजार स्पर्धामधील उपक्रमांचे स्थान, शेअर मार्केटमध्ये या उपक्रमांच्या समभागाचे मुल्य, सामंजस्य करारनामा रेटिंग, (महारत्न नवरत्न मिनीरत्नश्रेणी-I, श्रेणी II) दर्जा आणि ISO मानांकन या आधारावर सार्वजनिक उपक्रमांचे 4 गटात वर्गीकरण करण्यात आले आहे. 31/03/2014 पर्यत A -64, B- 68, C -46, D -04, आणि अवर्गीकृत सार्वजनिक उपक्रमांची संख्या 68 आहे.

**सार्वजनिक उपक्रम आणि निर्गुंतवणूकः**

निर्गुंतवणूक हा खाजगीकरणाचा एक महत्वाचा मार्ग आहे. निर्गुंतवणूक म्हणजे सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमामधील शासनाने धारण केलेल्या समभागाचा काही भाग खाजगी गुंतवणुकदारास विकणे होय. 51% अधिक समभाग विकल्यास प्रभावी खाजगीकरण घडवुन येते, तर 100% समभाग विकल्यास पुर्ण खाजगीकरण घडून येते. भारतामध्ये निर्गुंतवणूकीची सुरुवात 1991 मध्ये करण्यात आली. सार्वजनिक उपक्रमांची कार्यक्षमता सुधारण्यासाठी भारत सरकारने 24 जुलै 1991 ला औद्योगिक धोरण जाहीर केले. या धोरणात अन्य तरतुदीबरोबरच एक महत्वाची तरतूद सार्वजनिक क्षेत्रातील निर्गुंतवणूकीची होती. सार्वजनिक उपक्रमातील शासनाच्या भागधारणेचा काही अंश म्युच्यअल फंडस्, वित्त संस्था आणि सामान्य जनता व कामगारांना खरेदीसाठी उपलब्ध केला जाईल. मूळात हे धोरण स्वीकारण्यांची गरज निर्माण झाली होती. कारण या लोकउद्योगाचे असंतोषजनक कार्यनिष्पादन, कमीत कमी नफा, कमी उत्पादकता, दोषपुर्ण प्रशासकीय कामकाज प्रणाली, स्पर्धात्मक वातारणाचा अभाव यामुळे सार्वजनिक क्षेत्र संकटात सापडले होते. यासाठी हे अंशिक निर्गुंतवणूकीचे धोरण संकटात सापडलेल्या सार्वजनिक उपक्रमांना मदत करण्यासाठी स्वीकारले आहे.

**सार्वजनिक क्षेत्र निर्गुंतवणूक आयोगः-**

भारत सरकारने रंगराजन समितीच्या शिफारशीच्या आधारे 1996-97 च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये निर्गुंतवणूक आयोग स्थापण करण्यांची घोषणा करण्यात आली. त्यानूसार 23 ऑगस्ट 1996 रोजी श्री. जी. व्ही. रामकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली तीन वर्षांच्या कालावधीसाठी एक स्वतंत्र, अवैधानिक व सल्लागार मंडळ म्हणून 'सार्वजनिक क्षेत्र निर्गुंतवणूक आयोग' ची स्थापना करण्यात आली. नंतर या अयोगाचा कार्यकाल 30 नोव्होबर,1999 पर्यंत वाढविण्यात आला. आयोगाने 58 सार्वजनिक उपक्रमाच्या निर्गुंतवणकीबद्दल 12 अहवाल सादर केले. 25 उपक्रमामध्ये निर्गुंतवणूक स्ट्रॅटेजिक सेलच्या मार्गाने, तर 33 उपक्रमांमध्ये इतर मार्गाने करण्याची शिफारस करण्यात आली होती. याचा आधार घेवुन 16 मार्च 1999 रोजी सरकारने केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांचे विभाजन स्ट्रॅटेजिक आणि नॉन स्ट्रॅटेजिक क्षेत्रातील अशा दोन गटामध्ये करण्यात आले. स्ट्रॅटेजिक क्षेत्रामध्ये संरक्षण विषयक शस्त्रास्त्रे निर्तीती उद्योग, अणु उर्जा क्षेत्रातील उद्योग आणि रेल्वे वाहतूक क्षेत्रातील उद्योगाचा समावेश करण्यात आला.

**राष्ट्रीय गुंतवणुक निधी (National Investment Fund)**

मे 2004 मध्ये कॉग्रेसचे युपीए सरकार सत्तेवर आल्यावर सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमध्ये निर्गुंतवणूक धोरणात बदल करण्यात आले. यामध्ये स्ट्रॅटेजिक पध्दतीचा त्याग, केंद्रीय सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांचे स्वरुप न बदलता आरंभिक सार्वजनिक पेशकश(Initial Public Offering किंवा अनुवर्ती सार्वजनिक पेशकश (Further Public Offering) च्या मार्गाने सरकारच्या समभागातील छोट्या समभागाची विक्री, राष्ट्रीय गुंतवणुक निधीची निर्मिती इत्यादी निर्णय घेण्यात आले. यानूसार

27 जानेवारी, 2005 रोजी सरकारने 'राष्ट्रीय गुंतवणुक निधी' स्थापण करण्याचा निर्णय घेतला. केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमधील सरकारची अल्पमतातील भागिदारी विकुन प्राप्त पैसे ठेवण्यासाठी या निधीची निर्मिती करण्यात आली.मात्र जागतिक आर्थिक मंदीच्या कारणामूळे निर्माण झालेल्या अवघड आर्थिक परिस्थितीशी सामना करण्यासाठी एप्रील 2009 ते मार्च 2013 पर्यंत या निधीच्या उत्पन्नाचा पुर्ण वापर सामाजिक क्षेत्र कार्यक्रमांच्या भांडवली गरजा भागविण्यासाठी वापरला जाईल असा निर्णय घेण्यात आला आहे.

**सार्वजनिक क्षेत्र उपक्रम पुनर्रचना मंडळ ( Board for Reconstruction of Public Sector Enterprises)**

सरकारने केंद्रीय सरकारी उपक्रांचे सुदृढीकरण, आधुनिकीकरण, पुनसंर्रचना आणि पुनर्गठन करण्यावर अधिक भर दिला आहे. या संदर्भात कार्यनितीया, धोरण, विविध योजना आणि स्किम तयार करताना सरकारला सल्ला आणि मार्गदर्शन करण्याच्या उद्देशाने सल्लागार संघटनेच्या स्वरुपात 6 डिसेबर 2004 मध्ये सार्वजनिक क्षेत्र उपक्रम पुनर्रचना मंडळाची स्थापना करण्यात आली. या मंडळामध्ये राज्यमंत्री स्तरावरील एक अध्यक्ष, तीन अंशकालीन गैर-सरकारी सदस्य आणि तीन सरकारी सदस्य असतील. या व्यतिरिक्त अध्यक्ष लोकउद्योग निवड मंडळ, अध्यक्ष स्कोप (standing conference of public enterprises), तेल आणि प्राकृतिक गॅस निगम लि. हे मंडळाच्या बैठकीसाठी स्थायी आमंत्रित सदस्य आहेत. तसेच संबधित प्रशासकीय मंत्रालय आणि विभागाचे सचिव देखील या बैठकीस आंमत्रित सदस्य असतील. या मंडळाच्या 2004 पासुन मार्च 2013 पर्यत एकूण 30 बैठका झाल्या असून 62 केंद्रीय उपक्रमाबाबत सरकारला मार्गदर्शन केले आहे.

**स्वैच्छिक सेवा निवृत्ती योजना (Voluntary Retirement Scheme)**

90 च्या दशकात सार्वजनिक उपक्रमांचे पूनर्गठन करण्याची प्रक्रिया भारताने सुरुवात केली. ज्या उपक्रमांत अतिरीक्त कर्मचारी कार्यरत आहेत. अशा उपक्रमामध्ये 1988 पासून 'स्वैच्छिक सेवा निवृत्ती' योजनेची घोषणा करण्यात आली. स्वैच्छिक सेवा निवृत्ती योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी सध्या देशात दोन प्रारूप अस्तित्वात आहेत. ज्या उपक्रमांची आर्थिक स्थिती नफ्यांची आहे. असे उपक्रम स्वतः देखील स्वैच्छिक सेवा निवृत्ती योजना तयार करु शकतात परंतु त्याव्दारे कर्मचाऱ्यांना दिला जाणारा मोबदला हा प्रत्येक वर्षातिल 60 दिवसाचे वेतन इतकाच असावा अशी मर्यादा निश्चित करण्यात आली आहे. आज स्वैच्छिक सेवा निवृत्ती योजनेसाठी देशात दोन प्रारूप कार्यरत आहेत त्यामध्ये 'सार्वजनिक उपक्रम विभागाचे प्रारूप' आणि 'गुजरात मॉडेल' या प्रारुपाच्या आधारावर त्या कर्मचाऱ्यांचा सेवानिवृत्तीचा मोबदला निश्चित केला जातो. ऑक्टोबर 1988 पासून स्वैच्छिक सेवा निवृत्ती योजनेची अंमलबजावणी सुरु झाली असून मार्च 2014 पर्यंत या योजनेअंर्तगत 6.17 लाख कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे. अतिरीक्त कर्मचाऱ्यांना कार्यमुक्त करताना संबधित कर्मचाऱ्याचे आर्थिक हितसंबध जोपासण्यात भारत सरकारला या योजनेच्या माध्यमातून यश आले आहे.

**सी. आर. आर. योजना ( Corporate Social Responsibility)**

केंद्रीय सार्वजनिक उपक्रमांचे व्यापक आणि सुक्ष्म स्तरावर पुनर्गठन करताना प्रामूख्याने ज्या उपक्रमांत कार्यरत मनुष्यबळाची फेररचना करताना उपलब्ध माहीती तंत्रज्ञान आणि कार्यविशेषीकरणाचा आधार घेत अतिरिक्त मनुष्यबळाचा विचार करता या उपक्रमांत अतिरीक्त कर्मचारी कपात धोरण राबविणे आवश्यक बनले. यामुळे अनेक श्रमिक व कामगारांना आपला रोजगार गमवावा लागला होता. सरकारने या समस्याकडे मानवीय दृष्टीकोनातून पाहून त्या कामगारांना आपल्या कार्यात सुधारणा आणि संगठीत क्षेत्रात रोजगाराची संधी उपलब्ध व्हावी या हेतूने 1992 मध्ये राष्ट्रीय नवीकरण कोषाची स्थापना करण्यात केली. या निधीच्या माध्यमातून या कर्मचाऱ्यांच्या स्वैच्छिक सेवा निवृत्तीचा खर्च आणि त्यांना संगठित क्षेत्रात या कामगारांना रोजगाराच्या संधी निर्माण होण्यांच्या दृष्टीने विविध प्रशिक्षणांचा खर्च भागविण्यासाठी या कोषाची निर्मिती करण्यात आली होती. परंतु 2000 मध्ये राष्ट्रीय नवीकरण कोष बंद करण्यात आला व 2001-02 पासुन सार्वजनिक उपक्रम विभागा अंर्तगत सी. आर. आर. योजना सुरु करण्यात आली.या योजनेचा मुख्य हेतू हा स्वैच्छिक सेवा निवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांना

परामर्श, पुनःप्रशिक्षण आणि पुनर्नियोजन करणे हा आहे. या योजने अंतर्गत 2001-02 पासुन 2014 पर्यंत एकूण 27 कर्मचारी साहाय्यता केंद्र आणि 8 नोडल एजन्सी मार्फत 183124 लोकांनी या योजनेचा फायदा घेतला आहे.

**कारपोरेट सामाजिक उत्तरदायित्व (सी एस आर)**

प्रगती किंवा विकासा करीता प्रत्येक उद्योग त्यांच्या नफ्यातून काही खर्च करू लागले आहेत. कारण कुठलाही आर्थिक उद्योग हा समाजाचाच भाग असतो, उद्योजक हा एक देशाचा, समाजाचा, नागरिक असतो व त्याची समाजाप्रती काही कर्तव्ये असतात. या भावनेने प्रेरित होऊन सध्या सर्वत्र खूप चर्चेत असलेल्या कॉरपोरेट सोशल रेस्पॉन्सिबिलिटी, म्हणजेच उद्योगाची सामाजिक बांधीलकी या संकल्पनेचा उदय 1960 साली जागतिक पटलावर झाला. कारपोरेट सामाजिक उत्तरदायित्व ही संकल्पना भारतामध्ये देखील 2008 पासुन अधिक प्रमाणात चर्चेत असून खाजगी उद्योगांनी या दृष्टीकोनातून कार्य चालू केले आहे. भारत सरकारने एप्रिल 2010 पासून सर्व केंद्रीय सार्वजनिक उपक्रमामध्ये कॉरपोरेट सोशल रेस्पोन्सिबिलिटीचे धोरण राबविले जात असून ते आनिवार्य करण्यात आले आहे. सरकारने या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच या धोरणाचे राष्ट्रव्यापी माहीतीचे संकलन, प्रलेखन आणि जतन आणि संवर्धन करणे व कॉरपोरेट सोशल रेस्पोन्सिबिलिटीचा मुळभाव सर्व स्तरापर्यंत पोहचविण्यासाठी ‘राष्ट्रीय सीएसआर केंद्र’ टाटा इन्सटीट्युट ऑफ सोशल सायन्स, मुंबई येथे स्थापण करण्यात आले आहे. हे केंद्र केंद्रीय सार्वजनिक उपक्रमामार्फत केल्या जाणाऱ्या विविध कार्याची माहीती, प्रसिध्दी आणि संकलन करुन त्यासंबधी विविध प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यासाठी देशभरात 07 प्रशिक्षण उपसंस्था स्थापण करण्यात आल्या आहेत. या माध्यमातून देशातील विविध सार्वजनिक उपक्रमांतील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याचे कार्य या केंद्रामार्फत चालते.

**कारपोरेट प्रशासन आणि केंद्रीय सार्वजनिक उपक्रमः-**

90 च्या दशकात जागतिक स्तरावर आर्थिक क्षेत्रात होत असलेले बदल आणि त्या बदलानूरुप विविध संस्था आणि कार्यप्रणाली अस्तित्वात आल्या आहेत. त्यापैकीच एक म्हणजे कारपोरेट प्रशासन ही कार्यप्रणाली होय. पण या संकल्पनेवरुन औद्योगिक क्षेत्रात वाद-विवादास सुरुवात झाली आहे. कारपोरेट प्रशासनामध्ये शेअरधारक, कर्मचारी, ग्राहक, विनियामक प्राधिकरण या सर्व घटकांनी मिळवून या सर्व समूदयाचे हितसंवर्धन करण्यासाठी निर्माण करण्यात आलेल्या योजना आणि प्रक्रियांचा समावेश या संकल्पनेत होतो. ढोबळमानाने या संकल्पनेचा अर्थ या संबधित किंवा लाभार्थी बाहेरचा असो किंवा अंर्तगत असो त्यांचे हितसंबध जोपासण्यासाठी कारपोरेट आचरण किंवा नियमांचा या संकल्पनेत समावेश होतो. मुलतः कारपोरेट प्रशासन ही प्रणाली ‘पारदर्शकता आणि हिनार्थ प्रबंधन व्यवस्थापनावर’ अधारित असून कार्यसंचलनामध्ये आत्याधुनिक तंत्रज्ञानावर भर देवून शेअरधारक, निदेशक, लेखापरिक्षक आणि व्यवस्थपण याच्यात प्रभावी संतूलन आणि समन्वय साधण्यांचा प्रयत्न केला जातो.

भारत सरकारने कारपोरेट प्रशासनाच्या सिध्दांताचा विचार करता सार्वजनिक उपक्रमामध्ये कारपोरेट प्रशासन प्रणालीचा स्वीकार करण्यात आला. विशेषतः ज्या सार्वजनिक उपक्रमात मोठ्या प्रमाणात सार्वजनिक पैशांची गुंतवणुक केलेली आहे. अशा उपक्रमामध्ये ही प्रणाली अनिवार्य स्वरुपात लागू करण्यात आली आहे. या प्रणालीचा मुख्य उद्देश हा या सार्वजनिक उपक्रमात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व निश्चित करण्यावर अधिक भर दिला जातो. त्यासाठी विविध समित्यांची निर्मिती केली जाते. यामध्ये संचालक मंडळ, लेखापरिक्षा समिती, पारिश्रमिक समिती, साहाय्यक कंपनी समिती, डिसक्लोजर, धोरण निश्चती समिती, जोखीम व्यवस्थापन समिती, मॉनटीरींग समिती इत्यादी समित्यांची स्थापना कारपोरेट प्रशासनात केली जाते. या समित्यामधील सदस्यांची निवड आणि नियूक्ती संबधित प्रशासकीय विभागामार्फत केली जाते. परंतु या सदस्यांची नियुक्ती करताना 50% सदस्य हे गैर-सरकारी असले पाहीजेत. तसेच या समित्याची 3 महिन्यातून एकदा किंवा वर्षभरात 4 बैठका होणे आवश्यक आहे. या बैठकामधुन शेअरधारक, निदेशक, ग्राहक, लेखापरिक्षक आणि व्यवस्थापन यांच्यात प्रभावी समन्वय साधण्यावर भर दिला जातो.[42] 2013-14 या वित्तीय वर्षामध्ये स्टॉक एक्सचेंच मध्ये समावीष्ट असणाऱ्या सर्व सार्वजनिक

उपक्रमामध्ये अनिवार्य स्वरुपात कारपोरेट प्रशासन राबविण्यात आले. याचे मुल्यमापन करण्यासाठी सार्वजनिक उपक्रम विभागाने विविध निकषाच्या आधारावर या उपक्रमांचे ग्रेडिंग करण्यात आले. त्यामध्ये उत्कृष्ठ-22, अति उत्तम-06, उत्तम-02, संतोषजनक-02 , खराब-09 ग्रेडिंग मिळाले. परंतु 02 उपक्रम स्टॉक एक्सचेंच मध्ये सुचीबध्द आसुन देखील ही प्रणाली लागू करण्यात आली नाही.

1991 नंतर सार्वजनिक उपक्रमात सूधारणा करताना प्रामूख्याने एकाधिकार क्षेत्रातील सार्वजनिक क्षेत्राची संख्या कमी करणे, तोट्यात चालणारे उपक्रम बंद करणे, सार्वजनिक उपक्रमांत सरकारी गुंतवणूकीतील वाटा कमी करणे, व्यवस्थापकीय तत्त्वाचा स्वीकार करणे, निर्गुंतवणूक धोरणांची अंमलबजावणी करणे, लाइसन कोटा परमिट राजची समाप्ती करणे, MOU प्रणालीचा स्वीकार करूण या उद्योगांना अधिक स्वायत्तता देणे. सार्वजनिक उपक्रमांमध्ये अधिक पारदर्शकता आणि अनियीमतता दुर करण्यासाठी माहीती तंत्रज्ञानाचा वापर, कुशल मानवसंसाधनावर भर देवून अतिरीक्त कर्मचाऱ्यासाठी कपातीचे धोरण, कारपोरेट सामाजिक उत्तरदायित्व आणि सरकारी उपक्रमांचे सुदृढीकरण, आधुनिकीकरण, पुर्णसंरचना आणि पुनर्गठण इत्यादी विविध धोरणांची अंमलबजावणी सार्वजनिक क्षेत्रात केली जात आहे. या सर्व बदलामूळे सार्वजनिक उपक्रमांच्या निर्मिती मागील सरकारची पुर्वीची भूमिका आणि 1991 नंतर सरकारची भुमिकेत बदल झाला असला तरी या सूधारणामूळे सार्वजनिक उपक्रमांच्या स्वायत्तता बरोबरच या उपक्रमांचा कार्यक्षमतेमध्ये देखील वाढ झाली आहे.

**संदर्भ ग्रंथः**


- कटारिया सुरेन्द्र (2007), आर्थिक नीती एवं प्रशासन ,मलिक एण्ड कम्पनी जयपूर,
- विश्व संवाद केंद्र (2015), मुंबई सार्वजनिक क्षेत्रातील बदलाचे वारे, http.//www.vskmumbai.org/print.
- दत्त एवं सुन्दरम (2012),भारतीय अर्थव्यवस्था, एस.चन्द एण्ड कम्पनी लि.नई दिल्ली,
- Jadhav Narendr Indian industrial policy science 1956. Www. drnarendrajadhav. info/
- Prasad K. N. (1997), Indian economy since-independences- volume-I, National publishing house, New Delhi,.
- Singh Bishwa Nath (1991), public enterprise in Theory and Practice, Deep & Deep publications, New Delhi,
- माथुर बी. एल. (2007) 'आर्थिक नीति एवं प्रशासन', आर बीएसए पब्लिशर्स, जयपूर,.
- Patkar S. B.(2012) Disinvestment of public sector enterprises in India: An overview. www.damodarcollege.org/dhiru_final/santoshvol3.1.html
- Kadam Subesh (May 2014) Disinvestment Policy in India, Asian Journal of Multidisciplinary Studies, Volume-II, Issue 5.
- Misra, Puri (2011) Indian economy, Himalaya publishing house,
- Mathur B. P. (1999), Public Enterprises management, Macmillan Business Book.
- Chatterjee Anup (2012), Industrial Policy and Economic Development in India (1947-2012), New Century Publications New Delhi.
- Ministry of Finance, Department of Disinvestment. http://divest. nic.in/Nat_ inves_fund.asp.